महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. G9, प्रोफे. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. : ०२२ - २६४७ ४२११ विस्तारित - ३६४२, फॅक्स : ०२२ - २६५८ १५१६.
ई-मेल : promahagenco@gmail.com / promahagenco1@gmail.com

क्र. : सा.नि.सु./जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/२९ दिनांक : २२/१०/२०२०.

## वृत्तपत्र टिप्पणी

## महानिर्मितीच्या येलदरी जलविद्युत प्रकल्पातून बावन्न वर्षातील सर्वोच्च वीजनिर्मिती

**मुंबई (दि. २२/१०/२०२०)** : महाराष्ट्र राज्यातील वीज ग्राहकांना खात्रीशीर व किफायतशीर वीज पुरवठा करण्यामध्ये महानिर्मिती महत्त्वाचे योगदान देत आहे. महानिर्मितीचा येलदरी येथे २२.५ मेगावॅट स्थापित क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प असून या प्रकल्पातून प्रकल्प उभारणी नंतर प्रथमच१ एप्रिल ते २१ ऑक्टोबर या कालावधी मध्ये ४६.१४ दशलक्ष युनिट इतकी उच्चांकी वीज निर्मिती करण्यात आली आहे. संपूर्ण वर्षाकरिता ४१.०४४ दशलक्ष युनिट इतके वीज निर्मितीचे उद्दिष्ट असताना त्याहूनही जास्त वीज निर्मिती करत प्रकल्पाने ५२ वर्षातील सर्वोच्च कामगिरी करत विक्रमी वीज निर्मिती करण्यात यश प्राप्त केले आहे .

विशेष म्हणजे यातील३६.०२६ दशलक्ष युनिट इतकी वीज धरणातुन सोडून देण्यात येणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा वापर करून करण्यात आली आहे. मागील ५२ वर्षातील वीज निर्मितीच्या या सर्वोच्च कामगिरीबाबत येलदरी जल विद्युत प्रकल्प येथील अभियंता व कर्मचारी यांचे महाराष्ट्र राज्याचे ऊर्जामंत्री ना.मा. डॉ. नितीन राऊत तसेच महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. संजय खंदारे ( भा.प्र.से.) व महानिर्मितीच्या वरिष्ठ व्यवस्थापन यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

---

दिनांक : २२/१०/२०२०.

प्रति,
**मा. संपादक**
**दैनिक / वृत्तवाहिनी**

आदरणीय महोदय / महोदया,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तींत / वाहिनीवर प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपले स्नेहांकित,

**(महेश आफळे)**
**जनसंपर्क अधिकारी**